# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ३
## सभावृत्तांत

दिनांक - १/०७/२०१९ वेळ - दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.१/७/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
८. मा.सुनिता हेमंत तापकीर
९. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१०. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
११. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर – स्विकृत सदस्य
१२. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री. कोळप एस डी – प्रशासन अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्रीमती अमृता लागु - लेखाधिकारी, श्री.अघाव – कार्यालय अधिक्षक, श्री.एस.डी.निंबाळकर – आरोग्य निरीक्षक, श्री.विनय ओहोळ – उपअभियंता, स्थापत्य, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता, स्थापत्य,श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्रीमती अनुश्री कुंभार – उपअभियंता विद्युत, श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, , श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

मा.ग क्षेत्रिय कार्यालय मासिक सभेसाठी वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्यामुळे मा.संदिप वाघेरे यांनी सदर सभा तहकुब करणेत यावी अशी सुचना मांडली.
मा.बाबासाहेब त्रिभुवन यांनी सदर सुचनेस अनुमोदन दिले.

मा.अर्चनाताई बारणे यांनी सदर सुचनेस मान्यता देऊन सभा सोमवार दि.८/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात येईल असे सांगुन सभा तहकुब करण्यात आली.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**ग प्रभाग कार्यालय**
**कार्यपत्रिका क्रमांक - ३**
**सभावृत्तांत**
**(दि.१/०७/२०१९ ची तहकुब सभा)**

दिनांक - ८/०७/२०१९ वेळ - सकाळी ११ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची सोमवार दि.१/०७/२०१९ ची तहकुब सभा आज सोमवार दि.८/७/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.निलेश हिरामण बारणे
७. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
८. मा.सविता बाळकृष्ण खुळे
९. मा.सुनिता हेमंत तापकीर
१०. मा.चंद्रकांत बारकु नखाते
११. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१२. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री. कोळप एस डी – प्रशासन अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.आघाव – कार्यालय अधिक्षक, श्री.गट्टुवार देवान्ना – कार्यकारी अभियंता, श्री.विनय ओहोळ – उपअभियंता, स्थापत्य, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता, स्थापत्य,श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता, विद्युत,श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता,पाणीपुरवठा,श्री.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, श्री.जी.एन.खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.कोटीयाना डी एम - आरोग्य निरीक्षक , पशुवैद्यकिय, श्री.भागवानी सुनिल – उपअभियंता, नगररचना, श्री.ओंभासे – कार्यकारी अभियंता, स्थापत्य बी. आर. टी. एस,श्री.नरोटे – उपअभियंता, स्थापत्य उद्यान, श्री.वाळके – (ए.जी.एन्व्हायरो) श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्रीमती अनुश्री कुंभार – उपअभियंता विद्युत, श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, , श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ

अभियंता,स्थापत्य, श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत आली.

दि.१८ /६/२०१९ रोजीचे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र.२ ) कायम करणेत आला.

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - १

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.ग प्रभाग समिती सभा अध्यक्ष मा.अर्चना बारणे यांचे पत्र

मा.ग प्रभाग समिती सभा अध्यक्ष मा.अर्चना बारणे यांचे सुचनेनुसार ग प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहिल्या सोमवारी सकाळी ११.०० वाजता ( पहिल्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असेल तर दुस-या दिवशी) ग क्षेत्रिय कार्यालयाचे ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृहामध्ये आयोजित करण्यास मान्यता देणेत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - २

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा.माया बारणे यांचे दिनांक १७/०६/२०१९ चे पत्र..

मा.माया बारणे यांचे दिनांक १७/६/२०१९ चे पत्रानुसार मौजे थेरगाव सर्वे नं.१४/२ जयभवानी नगर सदर भागातील वाढती रहदारी लक्षात घेता ९ मीटर रस्ता करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये मान्यता देणे कामी व सुचना व हरकती अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कारवाई करण्याकरीता व शासनाला सदर प्रस्ताव सादर करण्यास माननीय आयुक्त यांना अधिकार प्रधान करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ३

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ** – मा.मनिषा पवार यांचे दिनांक १८/०६/२०१९ चे पत्र

मा.मनिषा पवार यांचे दिनांक १८/०६/२०१९ चे पत्रानुसार पदमश्री मा.श्री.मुरलीकांत राजाराम पेटकर यांचा नावाचा नामफलक बेलठीकानगर रोड येथील निवासस्थानी व निवासस्थानाकडे जाण्याचा मार्ग पवारनगर कॉर्नर या ठीकाणी लावुन देण्यात यावा कारण पेटकर सरांनी आजवर हाईडलबर्ग जर्मनी येथे १९७२ साली झालेल्या पॅरालम्पिक स्पर्धेत व्यक्तिगत सुवर्णपदक मिळवणारे श्री.मुरलीकांत राजाराम पेटकर हे पहिले क्रिडापटु होते. त्यांनी ५० मीटर फ्री स्टाईल पोहण्याच्या स्पर्धेत ३६.३३ सेकंदामध्ये अंतर पार करुन जागतिक विक्रम स्थापित केला होता. त्याच वर्षी त्यांनी अचुक भालाफेक व अडथळयाची शर्यत यांमध्येही सहभाग घेतला आणि या तिनही स्पर्धांमध्ये ते अंतिम फेरीत पोहोचले होते. याशिवाय हाँगकाँग येथे १९८२ साली झालेल्या फेस्पीक क्रीडा स्पर्धेत पोहण्याच्या स्पर्धेत त्यांनी सुवर्ण व कांस्य पदके मिळवली. १९६४ साली त्यांनी टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत बॉक्सिंगमध्येही सहभाग नोंदवला होता. तेव्हा त्यांनी देशासाठी रौप्य पदक मिळवले होते. इंग्लंडमध्ये १९६९ साली झालेल्या अपंगासाठीच्या आंतरराष्ट्रीय क्रिडास्पर्धेत त्यांनी पुन्हा पोहण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवले. हे पदक त्यांना राणी एलिझाबेथच्या हस्ते देण्यात आले. राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या विविध क्रिडास्पर्धामध्ये श्री.पेटकर यांनी १४० हुन अधिक पदके जिंकलेली आहेत. भारतीय सैन्यातील इ.म.ई विभागामध्ये ते काफ्टमन पदावरील खाजगी जवान म्हणुन कार्यरत होते. पाकिस्तान विरुध्दच्या १९६५ च्या युध्दात त्यांना बंदुकीच्या गोळया लागुन गंभीर इजा झाली व त्यांना अपंगत्व आल्यानंतर ते पोहणे व इतर खेळांकडे वळले. महाराष्ट्रातील क्रिडापटुंसाठीचा सर्वोच्च छत्रपती पुरस्कारही त्यांना १९७५ साली देण्यात आला. तरी सदरचे विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - ४

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

**संदर्भ** – मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक ३०/०५/२०१९ चे पत्र

मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक ३०/०५/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील मनपा मालकीच्या सर्व इमारतींच्या छतांवर सोलर पॅनल बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ५

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ३०/५/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ३०/५/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयामध्ये कित्येक वर्षापासुन पिंपरी वाघेरे गाव ते पिंपळे सौदागर दरम्यान नदीवरील समांतर पुल बांधण्याचे काम करण्यात येणार होते मात्र अजुनही सदर काम रखडलेलेच आहे. तरी आपण सदर कामाबरोबर पवना नदीवर कोल्हापुर पध्दतीचा बंधारा बांधल्यास नदीतील पाणी अडवुन मिलेट्री डेअरी फार्म परिसरामध्ये महानगरपालिकेतर्फे वृक्षारोपण करण्यात आलेल्या वृक्षांना पाणी देण्यास सोयीचे होणार आहे. तसेच परिसरातील शेती आणि भुजल पातळी वाढविण्यास मदत होणार आहे. तरी पिंपरी वाघेरे ते पिंपळे सौदागर दरम्यान नदीवरील समांतर पुल व कोल्हापुर पध्दतीचा बंधारा बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ६

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.सुनिता तापकीर अनुमोदक – मा.सविता खुळे

संदर्भ- मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड शहरामध्ये बेसुमार वाढत चाललेले नवनवीन इमारतींचे निर्माण मोठमोठया कारखान्यांमध्ये पाण्याचा होणारा अपव्यय, मान्सुन मध्ये कमी वृष्टी होणे, बेकायदेशीर रित्या खणलेल्या बोरवेल्स या आणि अश्या काही कारणांमुळे जमिनीखालील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. जमिनीखालील पाणी संपुर्णपणे नष्ट झाले, तर ती पाण्याची पातळी पुर्ववत करण्याकरीता किमान दहा ते पंधरा वर्षांच्या कालावधीसाठी पावसाचे पाणी जमिनीमध्ये जिरविले जाणे गरजेचे आहे. पाण्याचा मन मानेल तसा वापर केला जात असल्याने पाण्याचे स्तर कमी होत चालले आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होत असलेल्या हि विपरीत परिस्थीती बदलण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यापैकी एक पर्याय आहे रेन वॉटर हार्व्हेस्टिंगचा, म्हणजेच पाऊस पडत असतांना ते पाणी वाहुन न जाऊ देता, ते जमिनीमध्ये जिरेल अशी व्यवस्था करणे. रेन वॉटर हार्व्हेस्टिंग मध्ये पावसाचे पाणी घराच्या छतावरील टाकीमध्ये किंवा घराच्या जवळ जमिनीमध्ये असलेल्या टाकीमध्ये साठविले जाऊन ते शुध्द करुन पाईप्सव्दारे पुन्हा जमिनीमध्ये जिरविले जाते. महाराष्ट्रातील बहुतांश नगरपालिका, महानगरपालिका यांनी शहरामध्ये नव्याने विकसीत होणारे गृह प्रकल्प, कारखाने यांना रेन वॉटर हार्वेस्टींग करण्यासाठी खुप जास्त खर्च करण्याची गरज नाही. जमिनीखाली जे पाणी असते, ते प्रदुषित असण्याची शक्यता असते. मात्र पावसाचे पाणी प्रदुषणरहीत असल्याने ते साठविल्या जाणा-या टाक्यांना किंवा पाईप्सना गंज लागण्याची शक्यता अगदीच कमी असते. शिवाय पावसाचे पाणी साठविले गेल्याने ज्या काळामध्ये पाण्याची कमतरता होते, त्या काळामध्ये हे पाणी

उपयोगी पडु शकते. माझ्या प्रभाग क्र.२१ मध्ये महापालिकेच्या मालकीची शाळा, इमारती व्यापारी गाळे, सांस्कृतिक केंद्र, व्यायामशाळा इत्यादी मोठया प्रमाणावर आहेत. त्यांच्या छतावरील पडणा-या पावसाच्या प्रत्येक थेंबाची बचत रेन वॉटर हार्वेस्टींगच्या माध्यमातुन आपण करुन जमिनीमध्ये जिरविले गेलेले पाणी प्रभागातील उद्याने, शौचालय सफाई, गुरांना क्रिडांगणाच्या देखभालीसाठी विशेषत: कमी पाऊस झाल्यास, किंवा ज्या भागांमध्ये पाण्याची कमतरता आहे, अश्या ठिकाणी या साठविलेल्या पाण्याचा उपयोग होऊ शकतो. सुरुवातीची गुंतवणुक वगळता यानंतर कोणत्याही प्रकारची मशिनरी अथवा मनुष्यबळाची आवश्यकता पडेल असे मला वाटत नाही. सदरचा प्रस्ताव हा माझ्या प्रभागामध्ये प्रायोगिक तत्वावर जरी अमलात आणण्यात आला तर शहरातील बहुतांश भागांमध्ये या योजनेचा लाभ नक्कीच होईल अशी मला खात्री वाटत आहे. शहरातील लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे, उद्योग नगरी म्हणुन परराज्यातील नागरिकही शहराकडे आकर्षित होऊन दाखल होत आहे. आज शहराची लोकसंख्या २२ लाखांपर्यंत पोहचली आहे. तसतशी पाण्याची मागणी देखील वाढत आहे. पवना धरणाशिवाय शहराला पाणीपुरवठा करणारा भक्कम असा पर्याय उपलब्ध झालेला नाही. म्हणुनच अनेक ठिकाणी रहिवासी भागांमध्ये पाण्याची गरज भागविण्याकरीता बोरवेल्स खणल्या जात आहेत. परिणामी जमिनीखालील पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. जर पावसाचे पाणी जमिनीखाली जिरविले गेले, तर जमिनीखालील पाण्याच्या पातळीमध्ये पुन्हा वाढ होणे शक्य आहे. तरी माझ्या या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करुन पिंपरी चिंचवड शहरामध्ये रेन वॉटर हार्व्हेस्टिंग प्रकल्प उभारण्यात यावेत तसेच शहरामध्ये होणा-या नवनवीन गृहप्रकल्पांना तसेच जुन्या गृहप्रकल्पांना, कारखान्यांना, मनपा मालकीच्या मिळकती यांना देखिल हा प्रकल्प उभारणे कायद्याने बंधनकारक करण्यात यावे. तरी सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ७

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

**संदर्भ-** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड शहरात पवना, इंद्रायणी व मुळा नद्या वाहतात. या नद्यांना जाऊन मिळणारे अनेक लहान मोठे नैसर्गिक नाले आहेत. परंतु औद्योगिककरण आणि नागरिकरणाच्या रेटयाखाली शहरांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. हिच परिस्थिती राहिली तर येत्या काही वर्षात बहुतांश नैसर्गिक जलस्त्रोत नष्ट होतील, ती वेळीच रोखणे ही आपली व महापालिकेची जबाबदारी आहे. प्रत्येक पावसाळयात शहरातील विविध रस्त्यांमधील स्ट्रॉम वॉटर लाईनव्दारे पाणी नाल्यात जाते व पुढे ते नदीत जाते. काही ठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन बुजल्या गेल्या आहेत, त्याची देखभाल दुरुस्ती व्यवस्थितरीत्या होत नाही. तर कुठे स्ट्रॉम वॉटर लाईन ड्रेनेज लाईनला जोडल्या गेल्या आहेत. त्यातुन पावसाळयात हे पाणी डेनेज लाईनमध्ये जाते किंवा नाल्याव्दारे थेट नदीत जाऊन मिसळते. शहरातुन दर वर्षी लाखो लिटर पाणी वाया जाते. शहरासाठी या नैसर्गिक जलस्त्रोताकडे महानगरपालिकेने दुर्लक्ष करु नये. आपल्या महानगरपालिकेने शहरात सद्यस्थितीत असलेल्या ड्रेनेज लाईन, स्ट्रॉम वॉटर लाईनचे सर्वेक्षण करावे. त्याचा अभ्यास करुन हे वाहुन जाणारे पाणी महानगरपालिकेला कशा पध्दतीने उपयोगात आणता येईल? या पध्दतीने नियोजन करावे. नाल्यांचे

बांधकाम करुन पाणी अडविणे, पावसाचे पाणी शहरातील तळयांपर्यंत पोहचविणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, महानगरपालिका इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रयोग करणे आणि काही बगिचांसह अन्य ठिकाणी वापरणे इ.गोष्टींचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरी या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करुन पावसाळयाआधी स्ट्रॉम वॉटर लाईन्सचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ८

दिनांक- ८/०७/२०१९

सूचक- मा.सविता खुळे अनुमोदक – मा.निलेश बारणे

**संदर्भ-** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १०/५/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये कचरा कुंडी सर्वत्र दिसुन येत आहेत. सदर कुंडयांमध्ये ओला व सुका कचरा एकत्रित पणे टाकला जातो. त्यामुळे रस्त्यावरील जनावरे अन्नपदार्थ खाण्यासाठी कचरा कुंडीभोवती आढळुन येतात. डिलक्स चौक ते अशोक टॉकिज, वैभवनगर, कालिमाता मंदिर या सर्वच ठिकाणी सदर परिस्थीती आढळुन येत आहे. कित्येकदा जनावरांमध्ये झुंज होऊन नागरिकांचा अपघात झालेला आहे. तरी सदर समस्येवर डिलक्स पंपिंग स्टेशन मिलिंद नगर व पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर दरम्यान जोडणा-या पुलाजवळ महानगरपालिकेच्या जागेवर कचरासंकलन केंद्र झाल्यास प्रभाग स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ ३४ /२०१९
दिनांक - २९/०७/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.